# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

### प्रशासकीय तसेच अर्थसंकल्प व वित्त सल्लागार, पदासाठी सेवाकरार पध्दतीने नियुक्त करण्याबाबत

## //जाहीर सूचना//

शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उप सचिव व अवर सचिव यांच्याकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात सेवाकरार पध्दतीने प्रशासकीय तसेच अर्थसंकल्प व वित्त सल्लागार, पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इच्छूक उमेदवारांनी दिनांक १९/१०/२०२२ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत आवक जावक विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, सिनेप्लॅनेट सिनेमा समोर, शीव सर्कलजवळ, शीव (पूर्व) मुंबई ४०० ०२२ येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर पदाचे नाव ठळक अक्षरात नमूद करावे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सल्लागार | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. मंत्रालयातील उपसचिव पदावरील किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव. अर्थशास्त्र किंवा संख्याशास्त्र पदवी धारकास प्राधान्य |
| २ | अर्थसंकल्प व वित्त सल्लागार | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. मंत्रालयातील अवर सचिव पदावरील किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव. अर्थशास्त्र किंवा संख्याशास्त्र पदवी धारकास प्राधान्य |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. उक्त नियुक्ती सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ तसेच त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा, यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे राहतील.

२. करार पध्दतीने नेमणूकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती प्रथम १ वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नूतनीकरण करता येईल.

४. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

५. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा चालू प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

६. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

७. आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा ज्यादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. सदस्य सचिव, म. प्र. नि मंडळ, मुंबई यांना राहील.

८. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना आहेत.

**सही/-**

**(प्रविण दराडे, भा.प्र.से.)**
**सदस्य सचिव**